वर्ष ४३ अंक २

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

फेब्रुवारी २०२३

## अध्यक्षीय



प्रिय मित्रमैत्रिणींनो,

कसे आहात? नवीन वर्षाच्या केलेल्या प्रतिज्ञा अजून पाळत आहात ना?

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे (बीएमएम- बृ.म.मंडळ) काम तुमच्या सगळ्यांच्या सहकार्यामुळे जोरात चालू आहे. बीएमएम 2.0 पौरोहित्याची दुसरी बॅचदेखील संपूर्ण भरली! या उपक्रमाची धुरा यशस्वीपणे सांभाळल्याबद्दल बीएमएम 2.0चा प्रमुख कार्यकर्ता रणजित कामत व टीमचे मनःपूर्वक अभिनंदन. आपल्या इंडिया प्रोग्रामिंग टीमचे कामही जोरात चालू आहे. यावर्षी आपण राहुल सोलापूरकर, मिलिंद ओक, प्रशांत दामले, संकर्षण कऱ्हाडे, अमर ओक व संतोष पवार या कलाकारांना घेऊन सहा दौरे आयोजित करत आहोत! पहिला राहुल सोलापूरकर यांचा आयोजित कार्यक्रम 'सोल्ड आऊट' झाला आहे. या उपक्रमाची धुरा यशस्वीरित्या सांभाळल्या बद्दल बीएमएम 2.0 इंडिया प्रोग्रामिंगचे प्रमुख कार्यकर्ते नरेंद्र कल्याणकर, भाग्यश्री पटवारी, सोनिया मराठे व टीमचे मनःपूर्वक अभिनंदन.

बीएमएम 2.0 फिलॉसॉफी/तत्त्वज्ञान या कम्युनिटी आऊट-रीच प्रकल्पाची धुरा यशस्वीरित्या सांभाळल्याबद्दल वृषाली राऊत यांचे मनःपूर्वक अभिनंदन. 'बीएमएम 2.0 बी -कनेक्ट' या प्रोफेशनल नेटवर्किंग प्रकल्पाची सत्रे आता सुरू झाली आहेत. या प्रकल्पाची धुरा यशस्वीरित्या सांभाळल्याबद्दल समीर अहिरराव आणि टीमचे मनःपूर्वक अभिनंदन. बीएमएम 2.0 आर्टिस्ट प्रकल्पाद्वारे आपल्या समाजातील एका कलाकाराचे पेंटिंग जानेवारीत विकले गेले. या प्रकल्पाची धुरा यशस्वीरित्या सांभाळल्याबद्दल अविनाश साधू व टीमचे मनःपूर्वक अभिनंदन. युवा प्रकल्पाची सत्रे चालू झाली आहेत. यात उत्साहाने भाग घेतल्याबद्दल आपल्या मराठी युवा अमृता पेडणेकर व सायली नातू यांचे मनःपूर्वक अभिनंदन. 'बी एम एम मेडिटेशन' या प्रकल्पाची सत्रे नियमितपणे चालू आहेत. या प्रकल्पाची धुरा यशस्वीरित्या सांभाळल्याबद्दल अनघा बर्वे यांचे, बीएमएम करावके प्रकल्पाची धुरा यशस्वीरीत्या सांभाळल्याबद्दल प्रमुख कार्यकर्त्या शिल्पा शर्मा यांचे आणि बीएमएम 2.0 वारसा प्रकल्पाची धुरा यशस्वीपणे सांभाळल्याबद्दल डॉक्टर मेधा गोडबोले यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

मराठी शाळेच्या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका काढून तयार आहेत. उत्तररंग प्रकल्पाची महिन्यातून नियमितपणे दोन सत्रे आणि प्रांतीय विभागांमधेही सत्रे होत आहेत. 'रेशीमगाठी' उपक्रमात गेल्या तीन महिन्यात सुमारे २०० नवीन सदस्य झाले. बीएमएम 2.0 संकल्पनेचा उद्देश सर्व मंडळांचा विकास व मंडळांच्या मार्फत आपल्या समाजाची सेवा हा आहे. यासाठी आम्ही सर्व प्रकल्पातील 'रेव्हेन्यू'मधे मंडळांना सहभागी करत आहोत आणि मंडळांना बीएमएम 2.0 सहभागाचा-अहवाल पाठवत आहोत.

बृ. म. मंडळाच्या २०२४ मधील अधिवेशनाचे काम जोरात चालू आहे. हे सर्व काम जे माझ्या समितीच्या नेतृत्वाखाली चालले आहे, त्या माझ्या सहकाऱ्यांचे- अजित नातू- सेक्रेटरी, राजन पेडणेकर- खजिनदार, सविता मोरे- शाळा व युवा, मंजुषा नाईक- रेशीमगाठी व उत्तररंग, विराज राऊत- बी कनेक्ट व टेक्नॉलॉजी, अमोल उन्हेकर- अधिवेशन आणि प्रसाद पानवळकर-कम्युनिटी आऊट रीच प्रकल्प ; यासर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

बीएमएम 2.0 ॲप डाउनलोड करायला विसरू नका. https://bmm2.page.link/bmmapp या ॲपद्वारे तुम्हाला संपूर्ण माहिती देण्याचा आमचा प्रयत्न राहील. नेहमीप्रमाणे एका श्लोकाने थांबतो.

"सत्त्वं लघु प्रकाशकमिष्टमुपष्टम्भकं चलं च रजः ।
गुरु वरणकमेव तमः प्रदीपवच्चाऽर्थतो वृत्तिः || "

संदर्भ-सांख्यकारिका. (सत्त्व - short/small/light-weight and illuminates, रजः highly active- energy and तमः heavy - mass. Together they work like an oil lamp.

(oil - mass, वात - energy, ज्योत - light.)

आपला नम्र,

**संदीप दीक्षित** (अध्यक्ष बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
https://tweeter.com/bmmpresident |
https://www.facebook.com/bmm2022president

#bmm2.0 #communityCentricBMM #MandalMember #VruttaSubscriber

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त
**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय


**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**

vinata.kulkarni@bmmonline.org Or vinata@gmail.com

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**


**BMM Treasurer -** Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330 Email- Rajan.Pednekar@bmmonline.org


**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**

Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**

**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**

लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२-२०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| **सचिव:-** | अजित नातू | सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| **सदस्य:-** | अमर उऱ्हेकर | लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी |
| | सविता मोरे | सिॲटल, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:-** विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय

**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

**सदस्य** :- नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

**सदस्य** :- सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेक्टिकट

...



**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org
**इमेल:** vrutta@bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | पान क्र. |
|---|---|
| - अध्यक्षीय | १ |
| - श्रध्दांजली | ३ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन, बे एरिया- २०२४- वार्ता | ४ |
| - जागतिक मराठी भाषादिनानिमित्त शुभेच्छा, कविता | ५ |
| - व्हॅलेंटाईन दिनानिमित्त:- कविता, चित्रकल्पना | |
| - लेख:- भटके पक्षी – मंझिल वही है! | ६ |
| - कविता:-आनंदाचे झाड, Matrimonial Advertisement | ८ |
| - उ.अमेरिकेतील मराठी कवींना कवितास्पर्धेचेआवाहन | |
| - 'शब्दफोड'- मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा खेळ | ९ |
| - Article:- Rationalism and Hinduism | १० |
| - Article:- Aryan Parvatkar Got a Cricket Talent | ११ |
| - पुरवणी ऑनलाईन- अनुक्रम | |
| - बृ.म. मंडळाचे काही प्रकल्प पृष्ठ २, ४ आणि .......... | १२ |


## BMM BCONNECT

**Objective:** To connect, build and foster the Marathi professional community of North America.
**Activities:** Building your network, knowing more about starting your own business/ succeeding in your profession and contribution opportunities for you.
Also looking forward to connect with the experts from various professional fields who are willing to offer their expertise to the ones who in need.
If interested, below is sign-up link:- **https://bmm2.page.link/bconnect** and join the LinkedIn using the link:- **https://www.linkedin.com/groups/12709200** .

## बृ. म. मंडळ प्रकल्प

### खगोलशास्त्रावर व्याख्याने आणि परिसंवाद

ह्या हौशी खगोलशास्त्र-समुदायात भाग घेण्यासाठी खालील संकेतस्थळावर नावनोंदणी करावी.
**https://bmm2.page.link/astronomy**

## BMM KARAOKE

Every 2nd and 4th Sunday from 5 -7 PM EST. Registration link for BMM Karaoke:- **https://bmm2.page.link/karaoke**

# श्रद्धांजली



**भांडवलशाहीला समाजकार्यासाठी जुंपणारे एक समाज परिवर्तक- सुनील देशमुख -**

यांचे ४ जानेवारी २०२३ रोजी अमेरिकेत निधन झाले. अमेरिकन व मराठी समाजातील सामाजिक, वाङ्मयीन राजकीय आणि अर्थव्यवस्था या व्यासपीठावर सुनील देशमुख हे जिवंत आख्यायिका बनले होते. दांडगे वाचन, सखोल तर्कशुद्ध विचार, समतोल वस्तुनिष्ठ लेखन ही त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची खास वैशिष्ट्ये होती. वाङ्मय, समाजकार्य, पर्यावरण, राजकारण, अर्थव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी परिणामांवर लक्ष केंद्रित करून कार्य केलं. काही वर्षांपासून हृदयविकार, कर्करोग ह्यांच्याशी ते लढत होते. पत्नी, मुले व इतर नातेवाईकांच्या सान्निध्यातच त्यांचा शांतपणे मृत्यू झाला.

स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि निरीश्वरता अशा संस्कारात ते सांगलीत लहानाचे मोठे झाले. साने गुरुजी, कुमार सप्तर्षी, अनिल अवचट, क्रांती शहा आणि युक्रांद (युवक क्रांती दल)च्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता.

एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेत ते चौथे आले. मुंबई विद्यापीठातून त्यांनी केमिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. १९७० साली अमेरिकेत जाऊन त्यांनी केमिकल इंजिनिअरिंग मधे 'MS, MBA' आणि 'J.D. Law' ह्या पदव्या मिळवल्या. अशा वेगळ्या शिक्षणामुळे 'Goldman Sachs'नी त्यांना 'Commodity Trading' साठी बोलावलं. अल्पावधीत ते 'Head Trader' झाले आणि वैश्विक बाजारात त्यांनी नावलौकिक कमावला. धीरुभाई अंबानींनी त्यांना 'Trading' शिकवायला भारतात बोलावून घेतले.

पण यशाच्या अत्युच्च शिखरावर असतानाही वयाच्या ४५व्या वर्षी त्यांनी पैशाचा हव्यास न धरता, पूर्णवेळ सामाजिक कार्यात पदार्पण केलं. १९९४ साली $३००,००० देणगीमधून त्यांनी **स्वतःच्या नावाचा आग्रह न धरता,** "महाराष्ट्र फाऊंडेशन साहित्य पुरस्कार" योजना सुरू केली. समाज परिवर्तनात पुरोगामी वाङ्मयाचा वाटा फार मोठा आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन ही योजना पुरोगामी वाङ्मयासाठी आखली आणि तसे निकषही प्रसिध्द केले.

पुढे, दोनच वर्षांनी देशमुखांनी अधिक देणगी देऊन "समाजकार्य पुरस्कार योजना" अंमलात आणली. "जोडोनिया धन उत्तम वेव्हारे उदास विचारे वेच करी", हे संत तुकाराम महाराजांचे विचार त्यांनी अंमलात आणले. ही योजना पर्यावरण, दलित, स्त्रीमुक्ती यासंबंधित कार्य करणाऱ्या संस्था आणि कार्यकर्ते यांचा सत्कार करतेच पण नवीन कार्यकर्त्यांनाही प्रोत्साहित करते. मोठे पुरस्कार आणि शानदार समारंभ ही या योजनेची वैशिष्ट्ये ठरली. पुरस्कारांचे निकष व लोकशाही पध्दतीने नि:पक्ष निवड यामुळे कित्येक नव्याने पुढे आलेल्या तरुण, दलित लेखकांना पारितोषिके मिळाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील गुणी साहित्यिक व कार्यकर्त्यांचा शोध घेऊन त्यांचा सन्मान केला जातो. आजपर्यंत ३५० "साहित्य पुरस्कार" व "सामाजिक कार्यकर्ते पुरस्कार" दिले गेले.

पारितोषिक योजना जाहीर झाल्यावर देशमुख "महाराष्ट्र फाऊंडेशन"च्या कार्यकारिणीवर आले व नंतर अध्यक्ष झाले. फाऊंडेशनने प्रसिद्धी देण्यावर आणि निधी उभारण्यावर भर दिल्याने अनेक देणगीदार पुढे आले. "महाराष्ट्र फाऊंडेशन"चे नाव आणि कार्य भारतात आणि अमेरिकेत खूप गाजले. मोठ्या देणग्या आणि उच्चपदस्थ माणसांना जोडण्याची कला ह्या भांडवलांवर देशमुखांनी अनेक माणसं व संस्था जोडल्या. पर्यावरणाच्या क्षेत्रात अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष अल् गोर यांच्या Climate Reality Project वर त्यांनी काम केलं. भारतात पर्यावरण क्षेत्रात पारितोषिके देणे किती महत्त्वाचे आहे हे देशमुखांनी Sierra Clubला पटवून दिले आणि त्या कार्यक्रमाचे नियोजनही केले.

फ्लोरिडाच्या राजकारणापासून अलिप्त राहूनही त्यांनी तिथल्या स्थानिक नेत्यांना आर्थिक पाठिंबा आणि वैचारिक दिशा दिली. अमेरिकेतल्या आणि भारतातल्या राजकीय प्रश्नांवर सुनील देशमुखांचे संशोधन, लेखन सखोल व वस्तुनिष्ठ आहे. भारतात साधना नियतकालिकातून आणि प्रसार-माध्यमातून त्यांचे लिखाण जनसामान्यांपर्यंत पोचले. अमेरिकेतील वॉरेन बफे, बिल गेटस सारख्या श्रीमंतांनी आपली ९९% संपत्ती सामाजिक कार्यासाठी दिली. त्यांची ही संवेदनशीलता भारतीय उद्योगपतींमधे दिसत नाही. फाऊंडेशनच्या योजनात त्यांनी भाग घ्यावा, अशी देशमुखांची इच्छा होती.

सुनील देशमुखांसारख्या बुद्धिमान, कर्तृत्ववान आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या कार्यकर्त्यांची भारतात अनेकांना जाणीव आहे. पण दुर्दैवाने तशी जाणीव ५० वर्षांहूनही अधिक काळ त्यांची कर्मभूमी असलेल्या अमेरिकेत फार थोड्या लोकांना होती असे खेदाने म्हणावे लागते. त्यांच्या मृत्यूनंतर काही तासातच महाराष्ट्रातील वृत्तपत्रे व प्रसार माध्यमातून त्यांना श्रद्धांजली वाहिली गेली. त्याच प्रखर जाणीवेने व नेटाने आपण ते कार्य चालू ठेवणे हीच सुनील देशमुखांना श्रद्धांजली ठरेल.

**- राजन गडकरी** (माहवा, न्यू जर्सी)

**टीप:-** सुनील देशमुखांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी खालील वेबसाईट तयार केली आहे. Ctrl आणि Click करून जरूर भेट द्या.

**https://www.gatheringus.com/memorial/sunil-manohar-deshmukh/9651?c=973**

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रकल्प - 'वारसा'- YouTube मालिका

वारसा, जो वडिलोपार्जित आलेला आणि पुढच्या पिढीला सुपूर्त केलेला असा वारसा. मराठी समाजाने उत्तर अमेरिकेत स्थलांतर करताना बरोबर आणला संस्कृतीचा, शिक्षणाचा, आठवणींचा, आशीर्वादांचा आणि मराठी मातीचा वारसा. आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे, हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळं रोवून कसे भरभराटीला आलो, हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अशा गोष्टी एकत्रित केल्या, की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे, "वारसा" हा प्रकल्प.



**वारसा मालिका, भाग दुसरा :- "गोष्ट पहिल्या लग्नाची"**
उत्तर अमेरिकेतील पहिल्या मराठी थाटाच्या
लग्नाला चला, तुम्ही लग्नाला चला!
वर: प्रबोध लेले वधू: विजया गोखले
कार्यगृह: चॅपल UOM
तारीख: ७ ऑगस्ट १९६१
पुरोहित: डॉ. पद्माकर दीक्षित

वारसा मालिकेचा हा दुसरा भाग "गोष्ट पहिल्या लग्नाची" पहाण्यासाठी खालील (link) क्लिक करा किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. खालील यू ट्युब चॅनेलला like आणि subscribe करा.

**https://www.youtube.com/@bmm-varasa/videos**

***

## बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४ - वार्ता

**- सुधा राजदेरकर** (बृ.म. मंडळ अधिवेशन २०२४, स्मरणिका- उपसंपादक, महाराष्ट्र मंडळ बे एरिया, कॅलिफोर्निया)



हजारो मैल दूर उत्तर अमेरिकेच्या (अमेरिका व कॅनडा) धरतीवर वास्तव्याला आलेल्या आणि अनेक कारणांनी इथेच स्थायिक झालेल्या मराठी मनावर उत्तर अमेरिकेचा रंग कसा चढला, इथल्या संस्कृतीत मिसळताना मराठी माणसाने अमेरिकेला काय दिले याचा आढावा घेणारा BMM2024 स्मरणिकेचा विषेशांक काढण्याचा आमचा मानस आहे.

या स्मरणिकेच्या अंकाच्या संकल्पनेपासून प्रकाशनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ही एक मोठी जबाबदारी आहे. त्या जोडीला मायबोलीच्या प्रेमाने एकत्र आलेली आमची टीम आणि आवडीचे काम करण्याची संधी यांची मजा काही औरच आहे. स्मरणिकेच्या माध्यमातून तुम्हा सर्वांशी संवाद साधण्यास आणि तुम्ही पाठवलेले साहित्य प्रकाशित करण्यास स्मरणिका टीम आणि अधिवेशनासंबंधित सर्व कार्यकर्त्यांच्या टीम्स असे आम्ही सर्व खूप उत्सुक आहोत. तेव्हा मासिक बृहन्महाराष्ट्र वृत्त, अधिवेशनाचे संकेतस्थळ- https://www.bmm2024.org/ , बृहन्महाराष्ट्र मंडळाचे संकेतस्थळ- https://bmmonline.org आणि सोशल मीडिया मार्फत आम्ही सर्वांशी जरूर संपर्कात राहू. धन्यवाद!

***




मराठी भाषेतील नामांकित कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रातील जेष्ठ साहित्यिक **विष्णू वामन शिरवाडकर**, ऊर्फ **कुसुमाग्रज** यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस **जागतिक मराठी भाषा गौरव दिन**/मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त:-


## ठेऊया भाषेची जाण...

**- कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)



शब्दांची समृद्धी, शब्दांचीच खाण
करत राहुया मराठी भाषेत लिखाण
सुरेल वाक्यांची करुया देवाण घेवाण,
भाषेवर प्रेम करुनी, ठेऊया भाषेची जाण !

***




## प्रीत

**- प्रिया गोडबोले**
(एडिसन, न्यू जर्सी)



दोन खणांचे घरकुल
त्यात तुझी नी माझी चूल
समाधानाचे दोन घास
नजरेतुनी कबूल

कधी आसवांच्या जोडी
मीठभाकरही तोडी
हिंदोळ्यातल्या हासूला
तुझ्या जिव्हाळ्याची गोडी

नशिबी रुतलेल्या भेगा
चालताना टोचे पायी
सांजेला तुझी चाहूल
हीच सुखाची नरमाई

भरती न दिसे कधी
ओहोटीचे क्षण खूप
सागराच्या कुशीतले
शोधू शिंपल्यातले गुण

माझे तुझे नेत्र कोष
काळ्या तिटाचे प्रतीक
तुझ्या श्रमाच्या हातांना
माझ्या मायेची फुंकर !

***

## चित्र-विनीता वेल्हाळ , कल्पना व शब्दांकन- गौतम पंगू



# भटके पक्षी



भटके पक्षी थव्याथव्यानी येऊन बसतात.
त्यांच्या उडण्याच्या प्रत्येक कडव्याला देशांतराचे धृवपद असते...
अशी एक कविता आहे; ती मला आठवते कुठल्याही हटके ठिकाणी ! त्या भटक्या आणि 'हटके' आठवणींची काही शब्दांकने... तिथे भेटलेल्या माणसांसकट आणि संस्मरणांसकट ! - विद्या हर्डीकर सप्रे

## मंझिल वही है !

**विद्या हर्डीकर सप्रे** (मरिएटा, कॅलिफोर्निया)

"हाच तो पहाडी दगड ! त्यावर चाळीस वर्षांपूर्वी




माझा फोटो घेतला होता.", असे मी अचानक आणि उत्स्फूर्त बोलून गेले. "चला मग आता पुन्हा काढूया.." आकाश सळसळत्या उत्साहानं म्हणाला. आकाशचं दुसरं नाव 'उत्स्फूर्त' असं असावं ! "वेडा का काय तू ?, आता मला कसं चढता येईल? अरे, चाळीस वर्ष उलटून गेली ना ! शिवाय प्रकरण 'जड' आहे ! You have no clue." मी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होते. अखेर डावी उजवी करत करत माझं जड प्रकरण एकदाचं त्या कातळावर चढून उभं राहिलं आणि फोटोत डिजिटल झालं.

तर एका फोटोची ही दुसरी गोष्ट, अगदी काही महिन्यांपूर्वीची! कातळ तोच, योसेमिटी फॉल्सच्या वाटेवरचा. फोटोच्या चोकटीत उभे असलेले राही बदल गये! या योसेमिटी नॅशनल पार्कची कातळमाया गेली चाळीस वर्षे मला भुरळ घालत आली आहे. दर वेळी त्या भव्य पहाडांचं, त्यांच्या पाण्यातल्या नितळ प्रतिबिंबांचं, त्यांच्या चंद्रप्रकाशातल्या धूसरतेच, तिथल्या फेसाळणाऱ्या प्रपातांचं मनोहारी दर्शन मला नव्यानं विस्मित करत आलं आहे.

प्रथम पाहिला हा परिसर तेव्हाच नकळत ती 'आहा' दाद गेली. पाठीच्या कण्यातून ती सरसरत वर गेली. मन महिरून गेलं. क्षणभर स्वतःचं अस्तित्व विसरायला लावणारा तो साक्षात्कारी अनुभव! या पसाऱ्यात आपण किती 'कण' भंगुर आहोत याची ती जाणीव. या जाणीवेतून त्याचवेळी एका विशुद्ध प्रेमान भरून गेलेलं मन व मनभरून दाटलेली सगळ्या विश्वाबद्दलची माया.

"क्या बात है। निसर्गानं एकदम ब्लॅक अँड व्हाइट छायाचित्रण केलं आहे."- मी तेव्हा एकदम उत्स्फूर्तपणे बोलून गेले होते. योसेमिटी म्हणजे निसर्गाचं कृष्णधवल छायाचित्रण आहे. (उगीच नाही 'अँसल अॅडम्स'नं इथे बसून वर्षानुवर्षं कृष्णधवल छायाचित्र काढली.) ऐटीत उभा असलेला तो अल् कपितान! कातळराजा! आणि कातीव कांतीचा तो हाफ डोम! प्रथम पाहिला तेव्हा त्या कातळावर कुठे कुठे बर्फाचे कातीव आणि पारदर्शी कवडसे रेंगाळत होते. नदीच्या काठावर उन्हात विरघळताना दिसत होते. थंडीची एक किनार हवेला थंडावत होती. आम्ही दहा पंधरा जण होतो. तंबू टाकून दोन दिवस त्या 'आहा' क्षणांचे दिलदार अनुभव मनसोक्त घेत होतो. 'आहा'चा अनुभव एकत्र घेतला तर शतगुणित होतो. तेवढ्या भव्य परिघात सुद्धा योसेमिटी म्हणजे ते पंधरा मित्रांचं विशाल भावे कुटुंब, असं माझं छोटंसं समीकरण नकळत बनून गेलं.



चारुचा मुलगा प्रकाश तेव्हा. लहान होता. चार वर्षांचा असेल. मिशिगनच्या बर्फाच्या धूसर आठवणी असणार. पण. कॅलिफोर्नियामध्ये आल्यावर त्यानं बर्फ पाहिलं नव्हतं. त्यानं कुतूहलानं पटकन हात लावून पाहिला आणि एक खडा तोंडात टाकून खातीर केली. चेहेऱ्यावर त्याचा तो एक 'आहा' क्षण!

त्यानंतर दक्षिण कॅलिफोर्नियामध्ये आमच्याकडे आलेल्या प्रत्येक पाहुण्याला योसेमिटीच्या तीर्थयात्रेला घेऊन जायचं आणि पुन्हा पुन्हा तो आनंदानुभव घ्यायचा ही आमची प्रथा सुरू झाली.

त्या प्रथेप्रमाणे आम्ही आणखी एक सफर ठरवली. हे पाहुणे म्हणजे आमचे मिशिगनचे खास मित्र. मग बे एरियात रहाणाऱ्या आमच्या आणखी खास मिशिगन मित्रापर्यंत मी माझी फेसाळणारी उत्साहता दूरवाणीतून पोहोचवून आमचा योसेमिटीला जाण्याचा बेत जाहीर करून टाकला.

"चारू, आम्ही आणि देशपांडे उद्या सकाळी उठून योसेमिटीला जाणार आहोत. आम्ही तिथे एक केबिन ठरवली आहे आणि तिथे दोन दिवस रहाणार आहोत !"

वा. वा. फारच छान !" चारुचा नेहेमीच फेसाळणारा आवाज ! बस्स ! आम्ही फोन ठेवले.

दुसऱ्या दिवशी पहाटेच निघालो आणि बाराच्या

सुमारास ग्लेशिअर पॉईंटला पोहोचलो. काय आश्चर्य! तिथे भावे कुटुंब आमची वाट पहात होते. चारूनं नेहेमीप्रमाणं कूलर भरून जेवण आणलं होत. आणि बरोबर एक आश्चर्य आमच्यासाठी - अश्विन, आमच्या त्या पहिल्या कॅम्पिंग वेळी घेतलेल्या कातळावरच्या फोटोतला एक राही. आयत्या वेळी ठरवून असं काही करणे ही भावे कुटुंबाची ख्याती. पण बरोबर अश्विनला आणणे हे खास कौशल्य. कारण अश्विन म्हणजे सहा महिने आधी काटेकोर नियोजन करणारा. म्हणजे... "सकाळी सात वाजून दहा मिनिटे आणि पस्तीस सेंकंदानी निघायचं. मग 'योसेमिटी फॉल्स'ला अमुक वाजून तमुक मिनिटांनी पोहोचायचं. मग तिथे बरोबर दहाफूट आणि साडेसहा इंचावर एक चौरस कातळ आहे, बुटाचा बंद सुटत आला असेल तो नीट बांधायची ती जागा; तो अमुक अंशात वाकून बांधायचा आणि पुढे जायचं... " इ . इ.

अशा अश्विनला आयत्या वेळचा विषय पटवून गाडीत घालून योसेमिटीला घेऊन येणे हे काम विठ्ठलपंतांशिवाय कोणीही करू शकणार नाही! अश्विनला पटवण्यात एक तास दोन मिनिटे चार सेकंद गेल्यामुळे आम्हाला दोन मिनिटे चार सेंकंद उशीर झाला." भावे हसत हसत सांगत होते.

"म्हणजे यांनी गाडी विमान-वेगानं पळवली आणि दोन स्पिडिंग तिकिटे घेतली असणार !"

मग पुन्हा दहा वर्षांनंतरची अंगत पंगत. मंझिल वही, आणि राही वही! चारुची खास दही बुत्ती ती सुद्धा सही !

मग दोन दिवस नुसती धमाल... चारू आणि भारती शाळेतल्या मैत्रिणी. शुभांगी, चारू आणि मी ॲन आर्बरच्या विद्यापीठातल्या सहअध्यायिनी. अशोक आणि माधव हे मिशिगनचे मित्र, विठ्ठलपंत हे जगन्मित्र. आणखी सगळे मिळून आम्ही अकरा लोक होतो. भास्कर, प्रकाश, नीता, ही मुले वेगळ्या ट्रेकवर आणि आम्ही एका लहान ट्रेकवर गेलो होतो. मग ठराविक कोडॅक फोटो स्पॉट वर फोटो..: तीच पाऊलवाट... 'तो वारा फिरतो शीळ मुक्त घालतो' अशी शंकर रामाणींच्या कवितेची आठवण देणारी! वाऱ्याच्या सुरात पाण्यानं धरलेला ताल. त्यावर डोलणाऱ्या वृक्षराजीच्या हिरव्या सतारी. त्यावर उन्हाचा कवडसा आणि पाण्याच्या तुषारांची इंद्रधून! समोर तो योसेमिटीचा तीन-ताली प्रपात; निसर्गाचं रुणझुणतं गाणं. हजारो वर्षे निसर्गाचे बदलते ऋतू या मैफलीत रंगून गेलेले.

वाटेत कुरणात बसून भेळ खाणे, चवीला भावे यांचे विनोदी किस्से, शुभांगीचे गाणे. मग गाण्याच्या भेंड्या. संध्याकाळी गरम डाळ खिचडीचा बेत... अशोक, विठ्ठलपंत आणि अश्विन या कोकणी, कानडी आणि पुणेरी गप्पिष्ट लोकात कोण जास्त गोष्टी सांगतो याची चढाओढ. रात्री डोळे भरून पाहिलेलं रत्नखचित आकाश!

दर वेळी योसेमिटीची मंझिल तीच, पाहुणे बदल गये! प्रत्येक वेळी योसेमिटीच्या स्थळांवर, कातळांवर आणि दगडांवर आमच्या आठवणींच्या खुणा उमटवल्या. दरवेळी, आठवणी जागवल्या. "इथे आपण मागच्या वेळी असा फोटो काढला. इथे या रेस्टॉरंटमध्ये ती बहारदार डिश होती. इथल्या या हॉटेलमध्ये आपण मायक्रोवेव्हमध्ये पराठे गरम करून खोलीवरच जेवण केले." किंवा "इथे या बाकड्यावर दुपारचे जेवण केले. इथे पिझ्झा झाला. इथे या बाकावर बसून या विषयावर गप्पा मारल्या होत्या, नाही? इथे ते अस्वल दिसले. आठवतं? आणि इथे यावेळी पावसाची सर आली तेव्हा काढलेली श्रावणमासी हर्ष मानसी कवितेची आठवण? आठवते?"

वर्षांमागून वर्षे अशा स्मरण-खुणा साठत गाठत योसेमिटीची यात्रा चालूच आहे. कधी कुरणात रानफुले लेऊन सजलेल्या वाटांवर आम्ही दोघेच बागडलो. कधी ट्रेकिंग साठी मित्रांबरोबर गेलो. तर कधी सुट्टीसाठी... कधी बे एरियाच्या वाटेवर सहज म्हणून तर कधी, अगदी योसेमिटीच्या १५० व्या वाढदिवसासाठी मुद्दाम केलेली यात्रा. प्रत्येक वेळचे राही बदल गये... वेगळ्या वयाचे आणि वळणाचे! पण दरवेळी त्याच कोडॅक फोटो स्पॉटवर काढलेले फोटो जुन्या अल्बममध्ये बंदिस्त होऊन बसले आहेत. चाळीस वर्षांपूर्वी ज्यांच्याबरोबर ही यात्रा सुरू झाली, ते आता बेळगावपासून बे एरिया पर्यंत विखुरले आहेत. पण आमचं सर्वांचं मैत्र अजून तसेच आहे. योसेमिटीच्या कातळावर त्याच्या काही पाऊलखुणा उमटलेल्या आहेत.

मंझिल तीच ...तोच हाफ डोम...

कधी सकाळच्या कोवळ्या किरणांची पहाडी धून गाणारा. कधी सूर्यास्ताचा पिसारा आवरत श्री रागाची आवर्तने छेडणारा. संध्याकाळच्या किरणात झळाळून उठणारा आणि रात्रीच्या चंद्रप्रकाशावर सावली धरणारा 'हाफ डोम'चा धारदार कातळ तोच आहे. तोच अल कांपितान दिमाखात उभा आहे. 'व्हर्नोन फॉल'च्या 'ट्रेल'ची तीच नागमोडी वळणे, योसेमिटी फॉल्सची तीच भव्यता. भव्य प्रतलांचे स्तिमित करणारे विश्व् , खळखळणारी नदी. मिरर लेक मध्ये पडलेले पहाडाचे प्रतिबिंब. मिरर लेकची तीच उदात्त शांतता. सोनसळी सूर्योदय, अम्लान सूर्यास्त, निळ्याशार आकाशातले ढगांचे कापसेरी पुंजके.

हा अफाट परिसर म्हणजे साक्षात् चैतन्य आहे. दोन तासांपासून दोन हजार वर्षे आयुष्य असलेल्या फुले, पाने, झाडे, पक्षी, प्राणी, किडेमकोडे अशा अनेक सजीवांचं हे जीवनचरित्र आहे. कुणी त्याला म्हटलं आहे- 'Vibrant Tapestry of Life'! अनेकांच्या प्रयत्नातून जपलं गेलेलं हे राष्ट्रीय उद्यान... सर्वसामान्य माणसांसाठी उलगडलेलं हे भव्य, सुंदर, जिवंत, सदाबहार महावस्त्र! रानफुले लेवून सजलेल्या हिरव्या वाटा; त्यांची नवी नक्षी आणि निसर्गाची नवी रूपे... रुमझुम गाणी!

२०२२ मध्ये पुन्हा योसेमिटी ...मंझिल वही.. पण मित्र नवे, त्याच कोडॅक स्पॉटवर. आता आमच्या डिजिटल फोन -कॅमेरात त्या खुणा बंदिस्त होत आहेत.

चाळीस वर्षे उलटून गेली पण तो तिथेच असलेला कातळ पाहून मला पुन्हा तो कोडॅक फोटो स्पॉट आठवतो. कदाचित अवखळ आकाशला माझा तो तेव्हाचा 'आहा' माझ्या डोळ्यात दिसतो.' आणि तो 'चला तर मग, पुन्हा काढू फोटो' म्हणतो. मीही उत्स्फूर्तपणे छायाचित्रात तो 'वही' क्षण बंदिस्त करण्याचा प्रयत्न करते.



मी पुन्हा नव्या नवलाईच्या डोळ्यांनी स्मरणखुणा शोधत आहे. नदी खळाळते आहे. तिच्यातला तो कातळी दगड तिथेच आहे. त्याचं प्रतिबिंबही तसेच आहे. पण फोटो काढणारा दूर



निघून गेला आहे... मंझिल वही... राही निकल गया। तिथल्या त्या वृक्षावर हेमंताची रंगपालवी सळसळते आहे.

आठवणींची स्वरधून मनात पुन्हा उमटते आहे.

'तुझ्या स्वरमेळात माझ्याही क्षीण सुराची एक तान' असं म्हणणाऱ्या रवींद्रनाथांची कविता आठवते आहे. आणि आमच्या नव्या स्मरणाची पाऊलवाट उजळते आहे.

***

## आनंदाचे झाड

**- सौ. शुभदा सावरगांवकर** (न्यू जर्सी)



आनंदाचे झाड,
त्याला आनंदाची फुले
आनंदाच्या फुलांना,
मायेच्या नाजूक पाकळ्या
अतूट मैत्रीच्या -नात्यांच्या,
खाली काही बोचरे काटे
टोचणे बोथट होई, प्रेमाच्या वर्षावात,
मायेने घालू खतपाणी, करू संवर्धन
बहरे जीवन, देऊनी सुगंधी आनंद,
आपल्याही अंगणी, दरवळो प्राजक्त अनंत !

***

## उत्तर अमेरिकेतील मराठी कवींना आवाहन

**अक्षयभाषा - मराठी कविता स्पर्धा २०२३**

कविता स्पर्धेसाठी प्रवेश **विनामूल्य** आहे.

**या स्पर्धेचे सर्व नियम**:-खालील दुव्यावर आहेत.

**https://akshaybhasha.org/2023/01/akshaybhasha-kavitaspardha-2023/**

ही स्पर्धा **फक्त उत्तर अमेरिकेतील** सर्व वयोगटांसाठी खुली आहे. एका स्पर्धकास एकच कविता पाठवता येईल.

स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्या कवितांना $ १००, $ ७५, $ ५० अशी पारितोषिके दिली जातील.

कविता पाठवण्याची अंतिम तारीख- **फेब्रुवारी १८, २०२३**

कवितेचा निकाल **– फेब्रुवारी २८, २०२३**

कविता Microsoft Word Document मधे akshaykathaspardha@gmail.com इथे पाठवावी.

## MATRIMONIAL

**Hindu Marathi Girl USA Born**

**Age- 39, Height- 5'4", Vegetarian.**

**Her Hobbies are Music,Crafts and Hiking.**

**Education: MD, NEOMED College Ohio**

**[Cleveland Clinic University Hospital in Neurology and subspecialty Board certified in both, working as a hospital neurologist]**
**Contact: - Email - cardigan0181@gmail.com**




## मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा अद्भुत नवा खेळ

आवाहन:- कोणत्याही भाषेत अशी रचना करणे शक्य आहे का, की त्या रचनेमधील शब्दांची फोड केल्याने नवीन अर्थपूर्ण आशय निर्माण होऊ शकेल? मराठी भाषेत हा प्रयोग गंमतीचा व सहजसाध्य असावा या अंदाजाने हा खटाटोप! अशी रचना म्हणीसारखी संक्षिप्त, विशेष अर्थपूर्ण किंवा गहन विचारप्रवर्तक असल्यास अधिक छान!

**- अरविंद नारळे** (टोरांटो, कॅनडा)

(मात्रा वृत्त ९-९)

**कुसुमाग्रज.प्रिय कविता-कवाली**
**करिता कवि करी कसुनी तयारी**

(कुसुमाग्रजांना प्रिय असलेली कवालीरूपी कविता करण्यासाठी कवि कसून तयारी (प्रयत्न) करतो.)

(शब्दफोड करून)

**कुसुमाग्रज.प्रिय कवि ताक.वाली**
**करि ताक-विकरी* कसुनी तयारी**

(कुसुमाग्रज.प्रिय कवयित्री हल्ली ताक.विक्रेती, ताकाच्या विक्रीसाठी कसून तयारी करते.)
(* विकरी- विक्री - प्राचीन मराठी संदर्भ)

***

**- विनता कुलकर्णी** (शिकागो)

अरविंद नारळे यांच्या वरील दोन पंक्तींमधे माझ्या चारोळीची भर पुढील प्रमाणे:-

(मात्रा वृत्त ९-९)

**कुसुमाग्रज.प्रिय कवि ताक.वाली**
**करि ताकविक्री कसुनी तयारी**
**ताक-घुसळणी कवितालेखणी**
**जरी बोटांनी करी कामगिरी**
**काव्य-निर्मिती प्रतिभा फळाली**
**जरी काव्य रुची मनि पक्क झाली**

***



**- मंजिरी जोशी** (लुइविल्, टेक्सस)

**सारेगम सूर का लपेटीतचि रडले ?**
(शब्दफोड करून)
**सारे ग मसूर काल पेटीत चिरडले.**

***

**- विनता कुलकर्णी**

**दोनशे गड्यांचे काम एका रोबो समान!**
**यंत्रमानवाचा कर, कार्यक्षम अन् वेगवान**

(दोनशे गड्यांचे काम एक रोबो करतो.
(अशा त्या) यंत्रमानवाचा हात कार्यक्षम व वेगवान आहे.)

(शब्दफोड करून)

दोन शेगड्यांचे काम, एका रोबोस मान! (किंवा) -

**दोनशे गड्यांचे काम, एका रोबोस मान!**
**यंत्र मान वा चाकर, कार्यक्षम अन् वेगवान**

(दोनशे गड्यांचे काम करू शकणाऱ्या रोबोला यंत्र समज वा चाकर, (तो) कार्यक्षम व वेगवान असा (मानांकित) आहे.)

***

टीप:- "शब्दफोड" खेळात भाग घेण्यांस इच्छुक असणाऱ्यांनी आपली रचना **arvind.narale@sympatico.ca आणि vinata@gmail.com** या दोन्ही ईमेल पत्त्यांवर **महिन्याच्या २० तारखेपर्यंत, आपले नांव, गांव यांच्या उल्लेखासह** पाठवावी. आमच्याकडे आलेल्या रचनांमधील अर्थपूर्ण आणि उत्तेजनार्थ रचना बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील. रचनांमधे काही सुधारणा आवश्यक असल्यास त्याबद्दल अरविंद नारळे आपणांस सुचवतील.

- या सदरातील सर्व चित्रे अरविंद नारळे यांची निर्मिती आहे.

***

# Rationalism and Hinduism

**- Govind Jawalekar** (Miami, Florida)

Hindus consider the Vedas and later the Puranas as the original sacred texts, which define our religion. Unfortunately most Hindus have never read, taught, handled or even seen these books in any temple or their homes. Whereas the Bible and Koran find a revered place in almost every practicing Christian or Muslim home and even hotel rooms. For a common practicing Hindu, it is necessary to know what are the contents of the Vedas that he/she swears by. The Rig Veda the oldest and most important of all the Vedas is a collection of 1,028 Vedic Sanskrit hymns and **10,600 verses** in all, organized into ten books (Sanskrit: mandalas). The hymns and verses are mostly prayers, commentaries on rituals, ceremonies and sacrifices dedicated to Rigvedic deities like Agni, Varuna, Indra and others who are no longer worshipped by present day Hindus. Only the Upanishads, which are considered part of the Vedas occasionally discuss philosophy, nature of creation, creator, soul, death, after life, etc. From these emerge different schools of Hindu philosophy which include six systems (shad-darśana)– Sankhya, Yoga, Nyaya, Vaisheshika, Mimamsa and Vedanta. Interestingly among them, Samkhya and Mimamsa, while not rejecting either the Vedas or Brahman, typically reject a personal God, creator God, or a God with attributes. So the beginnings of rationalism/ atheism are right there in our oldest traditions. We lost them completely when the concept of mythological gods and temple worship was embraced much later partly as a counter to Buddhism. What represents Hinduism today is a collection of practices which include worship, prayers, fasts, pilgrimages and offerings to non-Vedic Puranic gods like Ganesha, Venkateshwara, Shanmukha, Kali, Vithal, etc. The Bhakti period further introduced a devotional dimension to these practices. The unfortunate consequence of all this is the total loss and extinction of the rationalistic approach in Hinduism. It is rationalism that drives scientific progress and betterment of human societies. Whatever prosperity and progress that has been recently achieved by Hindus and Indians in general is due to the advent of Information Technology, scientific, industrial and infrastructural developments in the last 30 years. Not by building more and bigger temples or conducting wasteful rituals. Educated and professionally successful Hindus anywhere owe their success to their intellect, hard work and rationalistic approach to everything they do in their professions. What is sad and unfortunate is their inability to apply the same approach to their beliefs and religious practices. Superstition, blind faith and extravagant display of religious festivals has overtaken the minds and reasoning faculties of common and even educated folks. Godmen, Gurus, Yogis, and Holy Magicians have been successfully selling snake oil to these folks. They do not realize that they are victims of these personalities who are successful entrepreneurs owning/controlling huge enterprises selling yoga, unproven medicines, and promises of fulfillment of all worldly and heavenly desires. Astrology got into the religious mix making it even worse. The faithful do not see the irony when a very famous miracle Baba who supposedly cured cancers from his followers died due to multiple organ failures in his own modern hospital but could not cure himself by his miracles. Even some scientists and educated people go beyond their areas of expertise to promote medicinal benefits of cow urine and cow dung and proclaim that every modern technology existed in the Vedic or Puranic period. If the technology really exists in our sacred scriptures why don't we use it and beat the scientific world. We have descended to this level only because we have been suppressing and killing scientific and rational thinking in our society. We are proceeding in the same direction as Afghanistan going back to the 7$^{th}$ century despite using satellite navigation and computer technology.

If we can go back to our roots and revive our traditions of rational thinking and behavior, we can uplift ourselves and achieve progress in our society in an accelerated way. Let us learn something from a very progressive society like the Jewish people. They too can boast of a very ancient religion. They too have very orthodox and ritualistic followers. But the majority are very rational, progressive and forward thinking. Israel is a testimony to all that. Jews and people of Jewish descent represent less than 0.20% of the world's population, but they represent 22.4% of all Nobel laureates (208 out of 930). Compare that to India with about 18% population of the world, it has produced only seven laureates and

Only three of those laureates were citizens of India (Mother Teresa, Amartya Sen and Satyarthi) and four were Indian by birth (Khorana, Chandrasekhar, Ramakrishnan and Banerjee), who did their award winning work in the West.
If Hindus have to flourish and reach their full potential we have to start with inculcating and promoting rational attitude and approach in our children and not compel them to follow superstitious practices of the grown-ups. Children should be encouraged to develop critical thinking at an early age. Their future and the future of Hindus is in their hands and minds.

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**- पुरवणी विभाग:-**
https://bmmonline.org/vrutta-supplements/
- कथा:- लव्ह इज इन द एअर- पान १४-१७
सुधीर धर्माधिकारी (सॅन होसे)
- राशिभविष्य:- फेब्रुवारी २०२३-
दादा दामले (न्यू जर्सी)
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## Aryan Parvatkar Got a Cricket-Talent

**Aryan Parvatkar** is 16 years old and lives in Seattle. He is a Junior in High School and is already a professional cricket player. He has been recently selected in the USA Cricket's National Under 19, West Zone Team.



Aryan started playing in Seattle's Youth Leather Ball league in 2017. The youth cricket league, which has flourished due showcase their skills and talent.
Since 2021, Aryan has been competing in national tournaments and was recently named in the Major League Cricket Chairman's Honors List due to his outstanding performances throughout 2022. The Honor's List consists of the top five percent cricketers in the country, and it was heartening to see that youth performances were being noticed.
Aryan's first introduction to cricket was at his age -two years. Ever since that day, he has been a huge cricket-fan. He started taking basic coaching at Pune Youth Cricket Club's summer camps when he was living in Pune, India. He moved to Seattle six years ago and immediately joined American Recreational Cricket League (ARCL) at the age 11 years, and started playing in Seattle's local youth leather ball cricket league the very same year. He has been playing in adult's Northwest Cricket League (NWCL) and MLC National Cricket League since 2021. During 2022, he was selected to Youth Minor League Cricket team, representing Seattle Thunderbolts.




As Cricket sports is growing across the nation, Aryan believes it provides great opportunities for many youngsters to learn, play, and enjoy this great game. Now that USA is developing several international standard cricket grounds and has attracted many international cricket players and coaches, it provides great opportunities to aspiring youth cricketers.
Bruhan Maharashtra Mandal's (BMM) new initiative to start cricket league across several cities is one such great opportunity for cricket lovers to play and enjoy the game. Aryan is super excited to see how BMM's initiative unfolds!

***

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**
**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

बृहन्महाराष्ट्र मंडळ



नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- [shala@bmmonline.org](mailto:shala@bmmonline.org)
[https://bmmshala.net/](https://bmmshala.net/)

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## फेब्रुवारी, २०२३

### - (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-

https://bmmonline.org/vrutta-supplements/

# लव्ह इज इन द एअर - "रेट्रो"

**- सुधीर धर्माधिकारी** (सॅन होजे, कॅलिफोर्निया)





"आज रात्री इथेच राहशील माझ्याकडे?" हा त्याचा प्रश्न ऐकून खरं म्हणजे तिच्या काळजाचा ठोका चुकला होता. पण तिने ऐकून न ऐकल्या सारखं करत काहीतरी म्हणायचं म्हणून म्हणलं,

"हे कॉफीचे कप कुठं ठेवू?"

आधीच त्याने धैर्य गोळा करून विचारलेला प्रश्न. परत विचारण्याकरता आता हरवलेलं धैर्य गोळा करण्यात वेळ लागणार.

ती आज त्याच्या अपार्टमेंटवर डिनर करता आली होती. म्हणजे त्यानेच बोलावलं होतं. सहा सात महिन्यांपूर्वी त्याने तिला पहिल्यांदा बघितलं होतं;. एका कविता वाचनाच्या प्रोग्रॅममध्ये. प्रेक्षकात असून सुद्धा त्याने तिला पटकन हेरलं. एक तर अगदी उत्साहाने पुढे बसलेली. सुंदर डोळ्यांमध्ये कविता ऐकण्याचा आनंद तरळत होता, ओठांवर एक नाजूक हास्य आणि कुठेही इकडे तिकडे लक्ष नाही. स्वतःमधेच रमलेली. चेहऱ्यावरची रेष न रेष कवितेचा प्रत्येक शब्द टिपून घेत होती आणि गव्हाळ विलोभनीय चेहरा कधी उजळून निघत होता तर कधी गंभीर, ते कवितेवर अवलंबून. कोणा आयोजकाच्या आग्रहाने मदतीला तो तिथे आलेला. स्टेज-व्यवस्था वगैरे. तसे त्याला कविता वगैरे प्रका दूरचेच. पण एखादी समोर आलीच तर, वाचून आनंद घेण्याइतपत संवेदनाशील तो नक्कीच होता. इथे सगळं लक्ष मात्र तिच्याकडे होतं. जसं काही कविता ऐकण्या ऐवजी, तिच्या चेहऱ्यावरून तो वाचत होता.

प्रोग्रॅम संपल्यावर ती कुठेतरी गर्दीत हरवून गेली. मग महत्प्रयासाने आणि संकोचाने प्रश्न विचारत त्याने तिची माहिती काढली होती. तिच्या घरी गेला सरळ. कारण लपून छपून रस्त्यात गाठणं त्याला पसंत नव्हतं. कोणीतरी दार उघडलं, बोलावल्यावर ती समोर आली. तो जरा जास्तच उंच तिच्यापेक्षा. सरळ धारदार नाक, उंचीपुरी शरीरयष्टी, चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि स्टायलिश लाँग हेअर कट. हातात एक कागद. म्हणाला, "तुम्ही त्या प्रोग्रॅमला आला होता नं ? जरा काम होतं फक्तं एक मिनिट. बाहेर येणार का ?" विचित्र नजरेने बघत ती बाहेर आली होती. तो म्हणाला, "आपली ओळख अजिबात नाही. पण मी त्या पूर्ण प्रोग्रॅमभर तुझ्याचकडे बघत होतो, खूप आवडलीस मला तू !" अशा अनपेक्षित वाक्यामुळे एकही शब्द न बोलता संकोचाने ती परत आत जायला लागली. परत जायच्या आत तिच्या हातावर त्याने कागद ठेवला. त्यात पूर्ण नाव, फोन नंबर, नोकरी कुठे आणि काय, वय किती वगैरे आणि चक्क दोघांच्या समान ओळखीच्या ४-५ लोकांची नावे. आणि शेवटी एकच वाक्य "फोनची वाट बघतोय!"

त्याचा आत्मविश्वास, त्याचं दिसणं, सडेतोडपणा, प्रामाणिकपणा आणि अचानक बिनधास्त "खूप आवडलीस मला तू", हे म्हणताना त्याच्या मिस्कील डोळ्यातला सच्चेपणा तिला रात्रभर झोपू देईना. का कोणास ठाऊक, त्या नावांच्या यादीतल्या कोणालाही काही विचारावं असं तिला वाटलं नाही. दोन दिवस तरी मध्ये जायला पाहिजेत, म्हणून तिसऱ्या दिवशी तिने धडधडत फोन केला.

"मी काही तुम्हाला हो म्हणायला फोन केला नाही", "मी तुम्ही नावे दिलेल्या कोणालाही मी कॉल केला नाहीये" वगैरे तिच्या गोष्टींवर तो फक्तं पण हसत हसत "माहिती आहे" म्हणत राहिला.

"तुम्हाला सगळं माहिती आहे, तर मग अजून काय माहिती आहे?"

"तू कॉल करणार हे माहिती होतं."

"ओह माय गॉड!"

"तुला वाटलं घरी आलो तुला शोधत म्हणजे असाच कोणीतरी रोडरोमीओ का? संध्याकाळी ५ वाजता लायब्ररीत ये, वाट बघतोय", असं म्हणून त्याने फोन ठेवला.

तिला वाटलं होतं त्यापेक्षा खूप वेगळंच बोलणं झालं होतं, त्याने खिल्ली उडवल्याचं जरा खुपत होतं पण त्याचा आत्मविश्वास मात्र आवडला होता.

मग असेच ते गेले सहा सात महिने भेटत राहिले. ती पण काही खिल्ली उडवण्यात कमी नव्हती. त्यामुळे दोघांचा संवाद असाच कायम राहिला. एकमेकांची चेष्टा करत, हसत खिदळत. शेवट मात्रं नेहेमी त्याचे तिच्या जवळ जवळ करण्यात जायचा. कधी कधी तिच्या ओढणीशी खेळायला लागेल तर कधी तिच्या कानाच्या पाळीशी तर कधी मानेवरच्या केसांशी. मग म्हणेल, "किती छान सुगंध येतो तुझ्या शेजारी!". मग ती म्हणायची, "तुझ्या डोक्यात असे काही विचार यायला लागले की, कानाच्या पाळी पासून पायांच्या तळव्यांपर्यंत सगळं सुंदर दिसायला लागतं, सुगंध यायला लागतात!"

पण आज मात्र तो काहीतरी वेगळा वागत होता. कारण खूप काहीतरी प्लॅन केलं होतं. तिच्या घरचे काही कारणाने शहरात नव्हते. घरी ती एकटीच असणार होती, कोणी वाट बघणारं नव्हतं. इथे त्याने आता फ्लॅट घेतला होता आणि तो पण एकटाच राहायचा. कशाबशा चवीची भाजी त्याने स्वतः केली होती. "अरे तू कशाला केलास स्वयंपाक?" या तिच्या प्रश्नावर "तुला इंप्रेस करायला" असं काहीतरी नेहेमीसारखं वेगळंच उत्तर पण नाही आलं. पण त्याच्या डोळ्यात भावना ओथंबून वाहात होत्या. त्याचं मधेच एकटक न्याहाळणं तिला अस्वस्थ करत होतं. चल, आता मी छान कॉफी करते वगैरे काही ना काही बोलून ती वेळ पुढं ढकलत होती.

आता मी जाते असं म्हणल्यावर मात्र तिला त्याने जोरात आपल्याकडे ओढून मिठीत घेतलं, कानाशी म्हणाला, "मला माहिती आहे, तुला ऐकू आलं मगाशी. मग रहाशील ना इथे आज?"

"अरे, काय झालंय तुला आज? बघू बरं ताप आहे का? का वेड ... "

"हो वेड लागलंय." तिचं वाक्यं मधेच थांबवत तो म्हणाला.

"तुला माहिती आहे ना त्या वेडाच्या भरात तू काय विचारतो आहेस?"

"मला माहिती आहे."

"मग असले विचार नाही आणायचे डोक्यात!"

"माझे नाहीत हे विचार. त्या फ्लॉवरपॉट मधल्या फुलांनी सांगितलंय मला तुला थांबवायला."

"अरे एकदम कवी वगैरे होतो आहेस का काय ? आणि हो बघितलं, आज अचानक फ्लॉवरपॉट दिसला इथे. सुंदर आहेत फुलं. मला इंप्रेस करायला आणलास ना ?" हसत हसत तिने विचारलं.

"नाही तुझ्या सोबतीकरता आणली आहेत, हे माझं फुल एकटं नको म्हणून!" तिच्याकडे रोखत तो म्हणतो.

आता मात्रं तिच्या पण डोळ्यात त्याच भावना साठून आल्या. स्वतःला सावरून ती म्हणाली,

"तुला माहिती आहे मी नाही म्हणणार आहे. मग का विचारतो आहेस. नको स्वतःला निराश करून घेऊस."

"नाही, राहाणार आहेस, मला माहिती आहे. माझ्यावर विश्वास आहे ना?"

"अरे विश्वास आहे रे. पण नको."

"नाही, ऐकणार नाही."

"अरे पण , माझे झोपायचे कपडे नाहीत, या जीन्स आणि शर्टावर आलीय मी!"

"मग नुसता शर्ट घालून झोप ना!"

"हाहा, सगळी उत्तरं तयार आहेत! खूप विचार केलेला दिसतोय."

"हो केलाय, आणि माझा टी शर्ट पण घालू शकतेस पण तो खूप लांब होईल, आणि मला तू व्यवस्थित दिसणार नाहीस. तोच तो मिस्कीलपणा डोळ्यात आणत तो म्हणाला.

"मला सगळं कळतंय बरं का की गाडी कुठं चाललीय!"

"त्या दिवशी मागणी घालायला आलो तेव्हाच म्हणणार होतो."

"काय?"

"नुसती आवडली नाहीस तर "सगळ्या बाजूने" आवडलीस असं."

"काय? मार खायचायं?" , ती हसत लाजत म्हणाली.

खूप आग्रह केल्यामुळे शेवटी ती म्हणाली, " ठीक आहे, पण घरी जाऊन येते."

"तुला कशासाठी घरी जायचंय, घरी जाशील आणि फोन करून सांगशील, नाही येत म्हणून."

आणि तसंच झालं, तासाभराने तिचा फोन आला. ती बोलायच्या आतच त्याने सुरुवात केली.

"मी म्हणलं होतं तुला, की तू येणार नाहीस, काहीतरी आता कारण सांगशील..." वगैरे.

त्याची सगळी चिडचिड झाल्यावर ती हसत हसत म्हणते,

" झालं बोलून तुझं? मी हे सांगायला फोन केला होता की, मी येते आहे. १५ मिनिटात पोचते आहे."

"येस ! आधी का नाही सांगितलं?"

"अरे तू बोलू तर द्यायला पाहिजेस ना?"

" परत त्याचं बोलून झाल्यावर ती म्हणाली, "पण एक अट आहे. तुझ्या डोक्यात धाडसी रोमान्सच्या कल्पना आहेत ना, त्याला प्रोत्साहन माझ्या कविता देतील, मी नाही!"

"आता याचा अर्थ काय?"

"नाही समजलं? बरं झालं! आणि हो, मी तुझ्या बेडरूममध्ये झोपणार आहे आणि तू बाहेर. भिंतीवरच्या चिकटपट्ट्यांवरून कळलं मला, मी येणार म्हणून त्या तुझ्या नटव्यांची हकालपट्टी केलीस, पण तुझी एक बया गोदरेजच्या कपाटाच्या आतून काढायची विसरलास, तिला पण काढ. "

चेष्टामस्करी करत करत, तिच्या चेहऱ्यावरून तिच्याच कविता वाचत दोघांचा वेळ जातो. परवा एक खूप छान वाक्य ऐकलं बघ. "तू आवडतेस म्हणून तू हवीशी वाटतेसच, पण तुझ्याबरोबर असताना मला मीच जास्त आवडतो, म्हणून तुझ्या बरोबर आवडतं."

"किती सुंदर वाक्य आहे रे!"

"खरंच, तुझ्याबरोबर असताना माझा मी असतो, सगळे मुखवटे पडून गेलेला, फक्त तुझा."

"हे बघ आत्ताच एक *कविता केली."

"अरे! आत्ताच्या आता, माझ्याशी बोलता बोलता?"

"हो, वाचते."

***"जाग"**

अंतरातून दाह
अंगावर काटा
स्पर्शाच्या साऱ्या
भुलवणाऱ्या वाटा

थांबायचे जरा
की घ्यायची उडी
भावनांचे झरे
वाहतात दुथडी

कधी थोडक्याची
अवीट गोडी
कधी मुक्त सोहळा
दोन जिवांस जोडी

कधी संभ्रमाचे
उरतात धागे
कधी रात्र वैरी
डोळ्यांत जागे

क्षणभर दोघं नि:शब्द होतात. थोडक्याची अवीट गोडी का मुक्त सोहळा दोन जीवांस जोडी? जे काही बोलणं होतं ते नजरेतून. मग तो हसत म्हणतो, "मुक्त सोहळा, दोन जिवांस जोडी" आणि ती मिस्किलपणे म्हणते,

"नाही, थोडक्याची अवीट जोडी."

दोघं आवेगाने मिठी मारतात. ओठांच्या रेषा. त्याला ती म्हणते, "जरा पाणी आणून ठेवशील का? " तो परत यायच्या आधी पटकन खोलीचं दार लावून कडी लावते. आतून म्हणते, "स्पर्शाच्या साऱ्या भुलवणाऱ्या वाटा, आज नाही." . हिरमुसलेला तो बाहेरून म्हणतो, "तर आज, अशी रात्र वैरी, डोळ्यात जागणारी?"

पहाट होते, मंद प्रकाश, पक्ष्यांच्या किलबिलाटाने त्याला जाग येते. कधी डोळा लागला कळलंच नाही. तो पटकन तिच्या खोलीची कडी वाजवायला जातो, पण दार उघडंच असतं. पहाटेच्या थंडीत तिच्या पांघरुणात शिरून मिठी मारतो. काही मिनिटं शांतता. म्हणतो,

"दार कधी उघडलंस? मला वाटलं, आत्ता सुद्धा लगेच पिटाळून लावशील मला."

"आत्ता भीती नाही, कारण पहारा करायला आता सूर्य येतोय, चंद्र जातोय. मुळात चंद्रच इतका मनानी हळवा आणि रोमँटिक, तो काय पहारा करणार, म्हणून पहाटे उघडलं दार."

"या सगळ्या तुझ्या वाक्यांचा माझ्या दृष्टीने एकच अर्थ आहे, माझ्यावर विश्वास नाही."

"बरोबर आहे, नाही विश्वास तुझ्यावर. पण त्या आधी माझा माझ्यावर विश्वास नाही. म्हणून निर्दयीपणे कडी लावली काल अचानक, स्वतःला आणि चंद्राला पण हिरमुसलं करून. असं वाटलं क्षणभर, तू खूप रागाने माझ्यावर चिडावंस आणि मला दार उघडायला भाग पाडावंस, पण तू माझ्याहूनही शहाणा निघालास!"

"थोडक्यात पुढच्या वेळेस काय करायचं मला कळलं!", तो खट्याळपणे म्हणतो.

"बघ सूर्य येतोय, पण आज त्याच्याही मूडचं काही काही खरं नाही, काय सांगतोय तो बघ आकाशात, त्याच्या मेघदूताकडून" ...आणि ती त्याला आकाशात तयार झालेल्या हृदयाकृतीकडे बोट दाखवते!

तो म्हणतो "लव्ह इज इन द एअर, हॅपी व्हॅलेंटाईन!"

***

*टीप: ही कथा कवयित्री - यांच्या * **"जाग"** कवितेवर आधारित आहे.



**प्रीती देशपांडे** (सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया)

***